नियमित दिवाणी दावा क्रमांक ९३/१९९९ मधील नि. १०० वर आदेश

वादीचा दुरुस्ती अर्ज व त्यावरील प्रतिवादीचे म्हणणे विचारात घेता खालील मुद्दे माझे पुढे निर्णयासाठी आलेले असून त्यावर कारणमिमांसा देवून खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १) वादीची दुरुस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुप पुर्णत: बदलत आहे काय ? | होकारार्थी |
| २) अंतिम आदेश काय ? | खालीलप्रमाणे |

**कारणमिमांसा**

२) अर्जावर उभयपक्षांचे प्रतिपादन ऐकण्यात आले वादीतर्फे प्रतिपादन करण्यात आले की, दाव्यात काही तांत्रिक दोष व हस्तलिखाई दोष झालेले असल्याने दुरूस्ती करणे भाग पडत आहे. वादीने परिशिष्ट नकाशात २० आर क्षेत्र दाखविले आहे, परंतु कोर्ट कमिशनरने नकाशात २४ आर क्षेत्र दाखविलेले आहे. दुरूस्तीमुळे मुळ दाव्यात कोणताही बदल होत नाही उलट न्यायदानास मदत होवून उभय पक्षातील वाद कायमचा संपुष्टात येणार आहे. त्यामुळे अर्ज मागणीप्रमाणे दुरूस्तीस परवानगी मिळावी.

३) याउलट प्रतिवादीतर्फे प्रतिपादन करण्यात आले की, दुरूस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरूपात व परिशिष्ट 'अ' मध्ये मौलीक स्वरूपाचा बदल होत आहे. वादीने दाव्यात काही महत्वाच्या ॲडमिशन दिलेल्या असून दुरूस्तीमुळे त्या पटलावरून जाणार आहे. वादी नं.२ चे मुखत्यारपत्र त्याने रद्द केलेले आहे. दावा मुलत: अतिक्रमणाचा नसुन मालकी हक्काचा आहे. वाद कारण दुरूस्तीमुळे बदलणार आहे. वाद मिळकतीत पक्के बांधकाम आहे ही वस्तुस्थिती

आहे. दुरूस्तीमुळे मोठा बदल होत असल्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

४) वरील प्रतिपादन विचारात ठेवून दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरूपात बदल होत आहे काय हे पडताळून पाहणेसाठी दाव्यातील परिच्छेद क्र.१ मध्ये परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे २० गुंठे अतिक्रमण केलेचे स्पष्टपणे नमुद केलेचे दिसून येते व दाव्यात अतिक्रमण मार्च १९९८ मध्ये केलेले नमुद आहे. तसेच वादीची मुख्य मागणी त्याप्रमाणेच आहे वादीने दाव्यासोबत कच्चा नकाशा दाखल करून अतिक्रमण वस्तुस्थिती दाखविलेली आहे. दाव्यावर प्रतिवादींनी २७/१२/१९९९ रोजी त्यांची कैफियत सादर केलेली आहे व त्यात त्यांची केस त्यावेळीच मांडलेली होती. वादीचे नि. १४ वरील अर्जाप्रमाणे कोर्ट कमिशनरमार्फत वाद मिळकत मोजण्याबाबत नियुक्ती करण्यात आलेली होती. सदर मोजणी नकाशा पाहता त्यात दोन वेगवेगळया ठिकाणी अतिक्रमण दर्शविलेचे दिसून येते. कमीशनरचे नकाशात गट नं. ३९० चे ३ आर क्षेत्र गट नं. ३८९ चे धारक वहीवाटतात व गट नं. ३९० व ३९१ चे २१ आर क्षेत्र गट नं. ३८ चे धारक वहीवाटतात असा खुलासा केलेला आहे. वादीचे परिशिष्ट 'अ' नकाशातील दाखविलेले अतिक्रमण व त्याबाबतचे पक्षकथनाचे वाचन करून कोर्ट कमिशनरचा नकाशाचे अवलोकन करता त्यात समानता दिसून येत नाही. वादीचे अतिक्रमणाचे पक्षकथन व परिशिष्ट 'अ' चा नकाशा विचारात घेवून कमिशन अहवाल चे वाचन करून वादी मागत असलेली अर्जातील पॅरा.नं. ३ प्रमाणे नमुद वस्तुस्थिती कमीशनरच्या नकाशात दिसून येत नाही. तसेच पहिले परिशिष्ट पटलावर असताना पुन्हा कोर्ट कमिशनरचा अहवाल दाव्याचा भाग समजल्यास दोन्ही एकसमान नसलेने त्यातून कायदेशीर गुंतागुंत वाढणार आहे. तसेच परिशिष्ट 'अ' मध्ये

मागितलेल्या दुरूस्तीमुळे संपूर्ण दावा मिळकतीचे स्वरूप बदलत आहे. वादीचे दुरूस्तीचे मागितलेल्या मागण्या मुळ मागण्यांपेक्षा आणि वेगवेगळया दिसून येत आहे. वरील सर्व वस्तुस्थितीचा विचार करता दाव्याचे मुळ स्वरूप बदलत असलेने अर्ज फेटाळण्यास पात्र आहे सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

वादीचा अर्ज फेटाळण्यात येतो.

दिनांक : ०८/०७/२०१०

( रतिलाल म. कराडे )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा